## प्रकरण पहिले

# कादंबरीचे स्वरुप आणि वाटचाल

# प्रकरण पहिले

# कादंबरीचे स्वरुप आणि वाटचाल

**प्रास्ताविक :-**

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. माणसाचा जन्म, जीवन प्रवास, मरण समाजातच घडत असते. एकुण माणसाचे सर्व आयुष्य समाजसापेक्ष असते. साहित्याचे स्वरुप ही समाजसापेक्ष असते. साहित्याची निर्मिती ही समाजात, समाजासाठी व समाजातील व्यक्तींद्वारा होत असते. साहित्य, साहित्यकार आणि समाज यांचा निकटचा संबंध असतो. तात्पर्य हेच की माणूस हा पूर्णपणे समाजसापेक्ष प्राणी आहे. साहित्य हे समाजनिरपेक्ष असणे कधीच शक्य नाही. उलट समाजाला साहित्य वळण लावत असते.

साहित्यातून सामाजिक बांधिलकी व्यक्त होत असते. समाज स्थितीगतीचे चित्रण होत असते. समाजाच्या स्थितीगतीचा परिणाम साहित्यनिर्मितीवर होत असतो. त्याचप्रमाणे समाज साहित्याकडून मनोरंजन, उद्‌बोधन यासारख्या अपेक्षा करीत असतो. साहित्याने ही समाजाच्या अपेक्षा साध्य कराव्यात ही रास्त अपेक्षा असते. प्राचीन काळापासून अशा प्रकारच्या अपेक्षांशी साहित्य निगडीत आहे.

कथा, काव्य, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इ. अनेक साहित्य प्रकारांपैकी 'कादंबरी' हा एक वाङ्मयप्रकार म्हणून मान्यता पावलेला आहे. हा वाङ्मयप्रकार गद्यातून विस्तृत जीवनपट मांडणारा वाङ्मयप्रकार म्हणून ओळखला जातो. अशा या कादंबरीबद्दल अनेक प्रश्न पडू शकतात. कादंबरीची उत्पत्ती केव्हा व कधी झाली ? कादंबरीची नेमकी व्याख्या कोणती ? कादंबरीचे घटक कोणते ? कादंबरीची वाटचाल कशी झाली ? या प्रश्नांच्या अनुषंगाने कादंबरी वाङ्मयाची संकल्पना स्पष्ट करणे उचित ठरते.

**कादंबरीचे स्वरुप :-**

कादंबरी हा अत्यंत मनोरंजक असा एक आधुनिक वाङ्मयप्रकार आहे. तिचा जीवनपट फार मोठा असल्याने जीवनाचे वैचित्र्य त्यात दाखविता येते. कादंबरी वाङ्मयाने सर्व मानवजातीला आपल्या कवेत घेतले आहे. मानवाची सारी सुख-दु:खे अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. मानवी जीवनाचा विशालपट उभा करण्याचे सामर्थ्य या साहित्य प्रकारात आहे.

मराठीतील 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराला 'नॉव्हेल' हा प्रतिशब्द वावपरला जातो. 'नॉव्हेल' या इंग्रजी संज्ञेपासून मराठीमध्ये 'कादंबरी' शब्द आलेला आढळतो. परंतु कादंबरी हे नाव मात्र संस्कृतमधील बाणभट्टाच्या कादंबरी या संस्कृत कथात्मक ग्रंथावरुन मराठीत रुढ झाले आहे. ''कांदबरी हे नाव संस्कृत-साहित्यातून मराठी वाङ्मयात आले असले तरी वाङ्मयाचा हा आधुनिक ललित प्रकार मात्र इंग्रजी साहित्याच्या परिचयाने आणि परिशीलनाने आलेला आहे.''[१] असे मत भवानीशंकर पंडित यांनी 'कादंबरीची रचना' या पुस्तकाच्या प्रास्ताविक विचारात मांडले आहे.

कादंबरीच्या स्वरुपाचा विचार करताना 'कादंबरी' या शब्दाचा अर्थ पाहणे गरजेचे आहे. ''कादंबरी या शब्दाचा अर्थ आसव, मद्य असा होतो. मद्य हे हे जसे प्रत्यक्षाचा विसर पाडणारे आणि कदाचित आल्हाददायक असते तसे काहीसे कादंबरीचे स्वरुप असते, असे म्हणता येईल''[२] असे कादंबरी स्वरुपाबद्दल श्री. मा. कुलकर्णी यांनी मत मांडले आहे. डॉ. किशोर सानप म्हणतात, ''कादंबरी हा रचना प्रकार जरी मराठीत इंग्रजीवरुन रुढ झाला असला, तरी कादंबरीची बीजे जुन्या गद्य वाङ्मयात आढळतात, जसे - लीळाचरित्र, स्मृतिस्थळे, बखरी, महिपतीकृत चरित्रे आदी.''[३] ह्या मताला भालचंद्र नेमाडे, बापट, गोडबोले ह्यांनी ही पुष्टी दिल्याचे नोंदवतात.

**कादंबरीची व्याख्या :-**

'कादंबरी' विषयक विवेचनामध्ये 'कादंबरी' या संज्ञेची व्याख्या पाहणे गरजेचे आहे. कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न आजवर अनेकांनी केला आहे. विशाल अशा मानवी जीवनाचं चित्रण करणाऱ्या कादंबरीचे स्वरुप गुंतागुंतीचे असल्याने तिला व्याख्येत बांधणे कठीण आहे. या वाङ्मयप्रकाराचे स्वरुपच असे आहे की, ते नेमक्या शब्दांच्या व्याख्येत सामावू शकत नाही. याबाबत श्री. मा. कुलकर्णी म्हणतात, ''कादंबरी हा अनिर्बंध व शिथिल असा प्रकार असल्यामुळे अमुक एक लिखाण कादंबरी आहे की नाही हे ठरविणे कठीण जाते. कादंबरीची निश्चित शब्दांत व्याख्या करणे यामुळेच अवघड आहे.''[४]

कादंबरीची संकल्पना कालानुसार बदलताना दिसते, तेव्हा कादंबरीची नेमकी व्याख्या करणे कठीण झाले आहे. तरीही कादंबरीच्या स्वरुपावर प्रकाश टाकणाऱ्या मोजक्या व्याख्यांचा विचार करणे गरजेचे ठरते.

'मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि स्वरुप' या पुस्तकात डॉ. मदन कुलकर्णी यांनी पाश्चात्य विचारवंतांच्या दिलेल्या व्याख्यांचा विचार करता, विल्यम् लिटील म्हणतो, ''ज्यात जीवनाचे प्रतिनिधित्व करणारी पात्रे व त्यांचे कार्य व्यापार चित्रित केले असतात, अशा कल्पित गद्य कथेला अथवा मर्यादित आकाराच्या वृत्तांताला कादंबरी म्हणतात.''[५]

ॲनेस्ट बेकर यांच्या मते, ''ज्यात मानवी जीवनाचे स्पष्टीकरण केले गेले असेल असा गद्यात लिहिलेला कल्पित वृत्तांत म्हणजे कादंबरी होय.''[६]

कॅथेरीन लिव्हर म्हणतात, ''कादंबरी म्हणजे मर्यादित लांबीचा गद्य वृत्तांत असलेला 'घाट' होय ज्यात लेखकाने निर्माण केलेल्या काल्पनिक - वास्तव जगतात वाचकाला गुंतविले असते ''[७]

''जिला काही विस्तार आहे, अशी गद्य कल्पित कथा म्हणजे कादंबरी अशी व्याख्या एका फ्रेंच लेखकाने केली असल्याचे श्री. मा. कुलकर्णी यांनी सांगितले आहे.''[८]

'कादंबरीची रचना' या पुस्तकात श्री मा कुलकर्णी यांनी हिंदी साहित्यिकांच्या व्याख्या दिल्या आहेत. डॉ. श्याम सुंदर दास यांच्या मते, ''उपन्यास मनुष्य के वास्तविक जीवन की काल्पनिक कथा है।''[९]

मुन्शी प्रेमचंद म्हणतात, ''मैं उपन्यास को मानव - चरित्र का चित्र मात्र समझता हूँ। मानव चरित्र पर प्रकाश डालना और उसके रहस्यों को खोलना ही उपन्यास का मूल तत्व है।''[१०]

श्री. मा. कुलकर्णी यांनी ''कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी''[११] अशी व्याख्या केलेली आहे.

तर ''सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करुन काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्वलंबित जीवित घटना यांचे गोष्ट रुपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवुन जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मयविभाग म्हणजे कादंबरी ''[१२] अशी प्रा. बापट-गोडबोले यांनी व्याख्या केली आहे.

अशा तऱ्हेने कादंबरीत सत्य सृष्टीबरोबर 'कल्पित सत्य' कथानकाच्या माध्यमातून वाचकासमोर ठेवण्याचा प्रयत्न कादंबरीकार करतो कुसुमावती देशपांडे कादंबरीबद्दल म्हणतात, ''पार्थिव संसाराविषयी आस्था ही कादंबरी वृत्ती. जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्वदर्शित्वाचा किंवा अद्‌भूताचा मार्ग धरुन मुलतः मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन. जीवनविषयक अनुभव व कल्पना हा कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री. ही वृत्ती हा दृष्टिकोन. हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एका विस्तृत आकर्षक कथानकाच्या द्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पध्दती.''[१३]

या व्याख्येतून कादंबरीचे स्वरुप समजण्यास बरीच मदत होते. ना. सी. फडके यांनी कादंबरीचा विचार करताना तांत्रिक अंगावर अधिक भर दिलेला दिसतो. ''गुंतागुंत, निरगाठ आणि उकल अशी तीन स्थाने कादंबरीत असावयास पाहिजेत.''[१४] अशा प्रकारची आग्रही भूमिका त्यांनी घेतलेली दिसते. शिवाय कादंबरी लेखनाचे हे तंत्र त्यांनी परिश्रमपूर्वक सांभाळलेले आढळते. ''कथानक व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरुप अशी निवेदन तंत्रे, वर्णने, वातावरणनिर्मिती, शैली इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.''[१५] अशी कादंबरीची रा. ग. जाधवांची व्याख्या डॉ.रवींद्र ठाकूर यांनी समाधानकारक ठरणारी आहे असे म्हटले आहे

कादंबरीचा सर्वसमावेशक आणि नेमकी अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाडे यांनी केला आहे. त्यांच्या मते, ''कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत. अशी साहित्यकृती असते. कादंबरीच्या सर्व गोष्टीमुळे एखादी मोठी कृती साकल्याने मांडता येते. सामाजिक आशय विशाल असावा लागतो. एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासकट मांडलेला असतो एखाद्या पोटसमूहाचे, पोट संस्कृतीचे तपशीलासह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्र बळकट असतात. पात्रे सलग उभी असतात.''[१६]

तथापि कादंबरीची सर्वमान्य अशी व्याख्या कोणीही करु शकलेले नाही. कारण बदलत्या काळाप्रमाणे कादंबरीच्या स्वरुपात बदल झालेले दिसून येतात. एक बाब लक्षात घेतली पाहिजे ती अशी की कादंबरीतून चित्रित होते ते प्रामुख्याने मानवी मन, मानवी जीवन, परंतु येथे माणूस प्रत्यक्षात जगत असलेले

जीवन कादंबरीतील जीवन यातील भेद लक्षात घेतला पाहिजे. कादंबरीत चित्रित होणारे जीवन प्रत्यक्षातील जीवन नसते. हे खरेच. परंतु ते जीवनासारखे असते जीवनाशी सुसंवादी असते म्हणूनच प्रत्येक चांगल्या कादंबरीतून आपणास जीवनाचा प्रत्यय येत असतो. कादंबरी हा लेखकाच्या व्यक्तिमत्वाने काही घटना व पात्रांच्या सहाय्याने जीवनाचा व मानवी मनाचा घेतलेला एक शोध ठरतो. कादंबरीचे वेगळेपण स्पष्ट करताना प्रा जान्हवी संत म्हणतात, ''मनुष्याच्या जीवनाचे विविधांगांनी केलेले चित्रण आणि त्याच्या चरित्राचा विविध परिस्थितीत दाखविलेला विकास ह्या दोन गोष्टी कादंबरीशिवाय इतर साहित्यिक प्रकारातून शक्य नसल्यामुळे हा वाङ्मय प्रकार लोकप्रिय झालेला आहे.''[१७]

उषा हस्तक यांनी कादंबरीच्या गुणधर्माचा विचार केला आहे

१. ''कांदबरी हे कथात्मक गद्याचे भरपूर लांबी असलेले रुप आहे. तिला किमान लांबी तरी हवीच. त्या शिवाय कादंबरी म्हणून तिचे अस्तित्व जाणवणार नाही.

२ ह्या वाङ्मयप्रकारात कथानकाला किंवा निवेदनाला महत्व असते

३ कादंबरीने व्यापलेल्या विषयाची वर्गवारी निश्चित करता येत नाही.

४. लघुकथा आणि लघुकादंबरी, ह्यापेक्षा तिला मानवी जीवन व्यवहाराचे दर्शन अधिक व्यापक स्वरुपात घडविता येते. कारण तिचा फलक त्यांच्याहून अधिक विस्तृत असतो.''

५. घटना, व्यक्ति, वातावरण, इत्यादी घटकांच्या साह्याने मानवी जीवनाशी निगडीत असणाऱ्या वास्तवाच्या विविधस्तरीय व्यामिश्र रुपांचे दर्शन तिला घडविता येतो. त्यासाठी सामान्यत: स्थल कालाच्या व्यापक पटाचा उपयोग केलेला असतो.''[१८]

अशा प्रकारे कादंबरीच्या या विचारातून तिचे गुणधर्म सांगून तिच्या वैशिष्ट्याचे स्वरुप मांडले आहे.

वरील सर्व व्याख्यांचे विवेचन केल्यानंतर 'कादंबरी' वाङ्मयाची वैशिष्ट्ये सांगता येतील. 'कादंबरी' ह्या वाङ्मयप्रकाराकडे कालमानानुसार पाहण्याची दृष्टी बदलत असल्यामुळे कादंबरीची नेमकी व्याख्या करणे जड जाते. 'कादंबरी' हे कथात्म गद्याचे विस्तृत रूप आहे. कादंबरी जीवनाचे चित्रण सत्याभास वास्तवपूर्ण ठरेल अशा रीतीने केलेले असते. ह्या वाङ्मय प्रकारात कथनाला व निवेदनाला महत्व असते. कादंबरीचा आशय तिच्या विस्ताराची मर्यादा निश्चित करतो. जीवनातील सत्यदर्शन कादंबरीत घडत असून

घटना व्यक्ति व वातावरण इ. घटकांच्या साह्याने मानवी जीवनाशी निगडीत असणाऱ्या वास्तवाच्या विविधस्तरीय व व्यामिश्र स्वरुपाचे दर्शनही कादंबरीतून घडविता येते. कारण कादंबरी ही जीवन विषयक आत्मविष्कारच ठरत असतो. थोडक्यात कादंबरी हा आशय आणि रुप याबाबतीत अत्यंत बहुविधता असलेला वाङ्मयप्रकार आहे.

**कादंबरीचे घटक :-**

कादंबरी ही मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी कथा आहे. कादंबरीची निश्चित अशी व्याख्या देता येत नसली तरी तिचे निश्चित असे घटक मात्र दाखवता येतात. कादंबरी ही निरनिराळ्या घटकांच्या समन्वयाची सृष्टी आहे. हे घटक प्रत्येक कादंबरीमध्ये कमी अधिक प्रमाणात पण निश्चितपणे पहायला मिळतात. आजपर्यंत कादंबरीने अनेक रुपे धारण केली आहेत. म्हणून तिने घटक बदलले असे नाही. तर त्याच घटकाधारे कौशल्यपूर्णतेने तिने वेगवेगळी रुपे धारण केली. म्हणून कांदबरीतील घटकांचे यथार्थ स्वरुप समजून घेणे कादंबरी वाङ्मयाभ्यासास तसेच कादंबरीचे मूल्यमापन व रसग्रहण करण्यास सोयीचे ठरते

''तंत्रदृष्ट्या कादंबरीचा विचार करावयाचा तर कथानक व स्वभावरेखन हे कादंबरीचे मुख्य घटक असून 'वातावरण', 'मनोविश्लेषण' व भाषाशैली यास कादंबरीचे सौंदर्य वाढविण्यास उपयोगी असे पूरक घटक मानले जातात.''[१९] असे कादंबरीच्या घटकासंबंधी बापट-गोडबोले यांचे मत आहे.

कादंबरी रचनेच्या दृष्टीने विचार करता, कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, संवाद, संघर्ष, मनोविश्लेषण इ. कादंबरीचे घटक मानले जातात. असे हे घटक कादंबरीमध्ये कशा पध्द्तीने अवतरतात याचा विचार आपणास करायचा आहे.

**कथानक :-**

कादंबरीचे प्रमुख तत्व कथा हे आहे. कथा हा कादंबरीचा प्राण आहे. मानवाचा स्वभाव आणि त्याच्या कृती यामधून घटना निर्माण होतात. त्या घटनांची कालक्रमानुसार मांडणी केली की, गोष्टी' तयार होते. कथा व कथानक ह्या दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत. कथानक हा कथा कादंबरीचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. कथानकामध्ये एक किंवा अनेक पात्रांच्या जीवनातील प्रसंगाची, समाजातील अनेक प्रश्नांची

गुंफण केलेली असते. कथानकात मौलिकता, संभवनीयता, सुसंघटितपणा, रोचकता इ. गुण असावे लागतात कथानकासंबंधी बापट-गोडबोले यांनी असे मत मांडले आहे की, ''कथानकाच्या विकासासंबंधी सर्वसाधारण असा सिध्दांत मांडता येईल की, कथानक शक्यतोवर एकजीवी (Organic Unity) असावे व त्यात थोड्या लवचिकपणे का होईना कृत्यैकता (Unity of action) साधली जावी.''[२०] कादंबरीच्या यशस्वीतेसाठी कथानकाचा आरंभ चित्तवेधक असणे गरजेचे असते.

कादंबरीतील एका प्रसंगातून दुसऱ्या प्रसंगाचे विकसन करीत असतानाच वाचकाची उत्कंठा वाढविली जाते व प्रश्नाची उकल करण्याचा प्रयत्नही कधी कधी केला जातो. विशिष्ट कालक्रमाने घडलेल्या घटनांचे कथानक कादंबरीत असते ''कथानक अधिक चित्तवेधक होण्यासाठी त्यात समरप्रसंग असावा, विरोधी पक्षाचे द्वंद्व असावे.''[२१] असे ना. सी. फडके म्हणतात.

कादंबरीतील कथानकात एकसूत्रीपणा त्यातल्या वृत्तीमधील एकता यांना महत्व असते निवडलेल्या घटना आणि त्याच्या कार्यकारण संबंधाच्या साखळीतून वाचकांची जिज्ञासा जागी ठेवण्याचे भान कादंबरीकाराला ठेवावे लागते. कथानक हेच खरे तर कादंबरीचा मुख्याधार ठरत असते. कथानकाच्या तीन अवस्था असतात त्या म्हणजे प्रारंभ, मध्य आणि शेवट या होत. कथानकाच्या क्रमश: विकास झाला म्हणजे तो मानवी मनाला पटतो कथानकाचा शेवट ही स्वाभाविकच असणे गरजेचे असते.

कादंबरीत मुख्य कथनकाबरोबर उपकथानके ही येत असतात. या दोहोंच्या गुंफणीतून आकर्षक कादंबरी लिहिली जात असते. कादंबरीतील उपकथांच्या संदर्भात प्रा.बापट गोडबोले म्हणतात, ''उपकथानके मुख्य कथानकाशी एकजीव झालेली किंवा साम्यविरोधाने मुख्य कथानकावर प्रकाश टाकणारी असली तरच ती मुख्य कथानकास उपकारक ठरतील, नाही तर ती बांडगुळासारखी उगाच वाढून मुख्य कथानकास अपकारक ठरतील.''[२२] थोडक्यात मुख्य कथेला, उपकथांची जोड दिली तर गैर नाही मात्र मुख्य कथेशी उपकथेचा अटळ संबंध असणे गरजेचे असते.

**व्यक्तिरेखा :-**

कादंबरीमध्ये असणाऱ्या व्यक्तिरेखा हा एक महत्वाचा घटक आहे कादंबरीला कथानक आवश्यक असते आणि कथानकाला पात्र आवश्यक असते. पात्रामुळे कथानकात चैतन्य निर्माण होत असते.

कोणतीही कलाकृती घेतली तर तिच्या केंद्रस्थानी माणूस असलेला पहावयास मिळतो. कादंबरीत पात्र आले की, त्याचे पात्रचित्रण ही पाठोपाठ येते. पात्र चित्रण म्हणजेच व्यक्तिरेखन होय.

व्यक्तिरेखन म्हणजे नेमके काय ? असा प्रश्न उभा राहतो. व्यक्तिरेखन म्हणजे व्यक्तिचे वर्णन, प्रत्येक व्यक्तिची व्यक्तिगत वैशिष्ट्ये असतात. यामध्ये त्याच्या रुपाची, स्वभावाची, वर्तनाची वेगवेगळी वैशिष्ट्ये येतात. ही व्यक्तिगत वैशिष्ट्ये शब्दबध्द् करणे म्हणजेच व्यक्तिरेखन करणे होय ही व्यक्ती कादंबरीत नायकं, खलनायक, नायिका अशा वेगवेगळ्या भूमिकेतून वावरत असते. अशा व्यक्तिची कल्पना यावी, तिचे जिवंत चित्र डोळ्यासमोर यावे यासाठी व्यक्तिरेखनाची आवश्यकता असते.

कादंबरीतील व्यक्तिरेखेविषयी श्री. मा. कुलकर्णी यांनी म्हटले आहे, ''कादंबरीतील पात्रे वास्तव व जिवंत असावीत व त्याचे वर्तन स्वाभाविक व सुसंसगत असावे. कादंबरीकाराने आपली पात्रे वाचकांच्यासमोर मूर्तिमंत उभी केली पाहिजेत.''[२३] कादंबरीत व्यक्तिरेखांचा विचार करता, मुख्य व्यक्तिरेखा, गौण व्यक्तिरेखा, पूरक व्यक्तिरेखा अशा अनेक व्यक्तिरेखा येत असतात कादंबरीतील व्यक्तिरेखा कशा असाव्यात यासंबंधी प्रा.बापट-गोडबोले म्हणतात, ''कादंबरीतील पात्रे काल्पनिक खरी पण त्यांच्यात जिवंतपणा येण्यासाठी त्यांना देव किंवा दानव कोटीतील करण्याऐवजी मानव कोटीतील करणेच जरुर आहे.''[२४]

**वातावरण :-**

कादंबरीतील कथानक व व्यक्तिरेखा यांच्या मानाने 'वातावरण' हा घटक गौण असला तरी कादंबरी रचनेतील त्याचे स्थान ही महत्वाचे ठरते. कथानक व्यक्ति आणि संघर्ष हे कादंबरीचे घटक वातावरण निर्मितीमुळे हुबेहूब प्रत्ययास येत असतात. वातावरण या घटकाबद्दल डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात, ''कादंबरीतील कथानक व व्यक्तिदर्शनाला उठाव देण्यासाठी हे वातावरण किंवा पार्श्वभूमी उपयुक्त ठरत असते ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्यामध्ये तर पार्श्वभूमीला कथानक व व्यक्तिदर्शनाएवढेच महत्व प्राप्त होते. प्रादेशिक कादंबरीचा तर पार्श्वभूमी आणि वातावरण हा घटक मूलाधार असतो ''[२५]

वातावरण किंवा पार्श्वभूमीचा विचार करताना, भौगोलिक किंवा स्थल विषयक पार्श्वभूमी, कालविशिष्ट पार्श्वभूमी व सामाजिक पार्श्वभूमी अशा तीन प्रकारच्या पार्श्वभूमीचा विचार महत्वाचा ठरतो.

याबाबत प्रा.बापट गोडबोले म्हणतात, ''चित्रकलेमध्ये पार्श्वभूमीचे जे कार्य तेच कादंबरीत वातावरणाचे आहे. चित्रातील पार्श्वभूमीने त्या चित्रातील देखाव्यास जसा एक प्रकारचा उठाव मिळतो, इतकेच नव्हे तर त्या चित्रातील विशिष्ट प्रसंगाचे मर्म कळण्यास जशी मदत होते. तसेच कादंबरीतील वातावरण हे कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडण्यास फार उपकारक होते.''[२६] वातावरणामुळे व्यक्तिचित्रणाला आणि कथानकातील प्रसंगांना अधिक उठावदारपणा येतो.

**संवाद :-**

संवाद हे नाटकाचे मुख्यांग होय. परंतु कादंबरी वाङ्मयातही संवादाचे महत्व आहे. संवादामुळे कादंबरीत नाट्य उत्पन्न होते संवादाचा एका बाजूने कथानकाशी तर दुसऱ्या बाजून व्यक्तिदर्शनाशी संबंध येतो. चार्लस मार्गन यांच्या मते, ''कथानकाला गतिमान करणे, व्यक्तिदर्शन घडविणे आणि वातावरण निर्मिती अथवा भाववृत्तीची निर्मिती करणे अशी संवादाची तीन कार्ये असतात.''[२७] कथानकाचा विकास करणे आणि स्वभावदर्शन घडविणे या दोन्ही गोष्टी कादंबरीकार संवादाद्वारे साध्य करण्याचा प्रयत्न करीत असतो.

संवादाचे महत्व स्पष्ट करताना श्री. मा. कुलकर्णी म्हणतात, ''संवादामधून अनेक घटना कळू शकतात. तसेच निरनिराळ्या पात्रांची विशिष्ट घटनेविषयीची प्रतिक्रियाही कळू शकते. पात्रांच्या मनातील विचार-विकार, भाव-भावना इ. कळण्याचे संवाद हे एक उत्कृष्ट साधन आहे.''[२८]

उषा हस्तक यांनी ही कादंबरीतील संवादासंबंधी विवेचन करताना म्हटले आहे, ''व्यक्तीच्या गरजामुळे सभोवतालच्या जगाशी त्याचे अपरिहार्य संबंध निर्माण होतात. व्यक्तीचे अनुभवविश्व संवादातून साकार होत असते. या संबंधामागचे हेतू व स्वरुपे विविध असतात. या सर्व संबंधांना जोडण्याचे प्रयोजन आणि मानवी स्वरुप व्यक्त करण्याचे सुलभ प्रभावी माध्यम म्हणजे संवाद होत. संवाद मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहेत.''[२९]

निवेदन व संवाद यांची सांधेजोड कांदबरीत महत्वाची असते. अन्यथा संवाद उपरे वाटू लागतात. बोजड भाषा, अलंकार प्राचुर्य, कृत्रिमता या दोषापासून संवाद दूर असणे गरजेचे असते.

**भाषाशैली :-**

भावना व विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय. तर अनुभवाची मांडणी करण्याची लेखकाची पध्दती म्हणजे शैली होय. कादंबरीचे लेखनात कथानकाच्या मांडणीला, व्यक्तिरेखाटनाला, प्रसंगनिर्मितीला आणि वातावरणाच्या निर्मितीला भाषाशैलीमुळे उठावदारपणा प्राप्त होत असतो.

**मनोविश्लेषण :-**

कादंबरी हा कादंबरीकाराच्या मनाचा सत्याधारित पण काल्पनिक खेळ असतो. कादंबरीत कादंबरीकार वेगवेगळी पात्रे योजतो आणि त्याच्या आधारे त्याला सापडलेले जीवनसत्यच मांडण्याचा प्रयत्न करतो. कादंबरीत मनोविश्लेषण नावाचा पात्रांची भूमिका किंवा मानसिकता स्पष्ट करणारा एक घटक कार्यरत असतो. प्रत्येक पात्राची मानसिक घडण वैशिष्ट्यपूर्ण असू शकते. ही वैशिष्ट्यपूर्णता वाचकाच्या लक्षात यावी म्हणून कादंबरीकाराला मनोविश्लेषणात्मक लेखन करावे लागते. ''मनाचे अगदी सुक्ष्मांतले सुक्ष्म तंतू कसे हलत असतात स्वाभिमान, प्रेम, स्वार्थ, औदार्य इ. विकारांची आंदोलने या मनोसरोवरात कशी चालू असतात. याचे यथार्थ वर्णन म्हणजे मनोविश्लेषण.''[३०] हे डॉ. प्र. ना. अवसरीकर यांनी डॉ. पु. ग. सहस्त्रबुध्दे यांचे मनोविश्लेषणाबाबत नोंदविलेले मत महत्वपूर्ण वाटते.

अशा प्रकारे कथानकापासून मनोविश्लेषणापासूनचे घटक कादंबरीत कार्यरत असतात. या सर्वाच्या संमिश्र वापरातून कादंबरी निर्माण होत असते. या सर्व घटकांचा वापर प्रधान, गौणत्वाने होत असला तरी कोणताही घटक वगळता मात्र येत नाही. हे सर्व कादंबरीतील महत्वाचे घटक असून त्यांच्या आधारे कादंबरीचे आकलन आणि परीक्षण करता येते.

**कादंबरी व इतर वाङ्मयप्रकार :-**

कादंबरी हा वाङ्मयप्रकार आज सर्वश्रेष्ठ वाङ्मयप्रकार असलेला दिसून येतो. या वाङ्मयप्रकाराने जी लोकप्रियता मिळविली, स्वतःचे स्थान तयार केले, ते त्याच्या अंगभूत वैशिष्ट्यामुळेच. मराठी कादंबरीचा इतिहास फार मोठा नाही. नाट्य, काव्य, यांना जशी प्राचीन परंपरा होती, त्या तुलनेत कादंबरीचा कालखंड दीडशे वर्षाचा म्हणजे कमीच आहे. कादंबरीच्या सर्वश्रेष्ठतेचे आणि लोकप्रियतेचे कारण शोधताना असे जाणवते की, कादंबरीचे नाटक, कथा, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, पत्र या सर्व वाङ्मयप्रकाराचे

गुणविशेष पचविले आहेत व ती विशाल बनली आहे. अशाप्रकारे तिने वरील वाङ्मयप्रकारांची एकात्मता साधली आहे या आधारानेच तिने आपले स्थान निश्चित केले आहे. कदाचित यामुळेच बऱ्याच लेखकांचा कादंबरी लेखनाकडे कल असावा.

काव्य फक्त कवितेत असते असे नाही. ते कादंबरीत सुध्दा असू शकते. काही वेळेस कादंबरीच्या पानापानातून काव्य भरलेले दिसून येते. कादंबरीतील 'पात्र' हा घटक मध्यवर्ती आहे. ही पात्रे जेव्हा एकमेकांसमोर येतात तेव्हा त्यांच्यात संवाद घडतो ती एकमेकांशी बोलतात. संवादाचा संबंध एकीकडे कथानकाशी तर दुसरीकडे व्यक्तिदर्शनाशी आहे. असा हा संवाद घटक विशेष प्रामुख्याने नाटकाचा आहे. तरी कादंबरीत काव्याबरोबर नाटकाचा सुध्दा भाग असतो चरित्र आत्मचरित्र हे स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून जरी गणले जात असले तरी कादंबरीने वरील दोन्ही वाङ्मयप्रकारांचे घटक आपलेसे केलेले दिसतात. निबंध हा वाङ्मयप्रकार वैचारिक साहित्यात मोडणारा प्रकार आहे. वैचारिकता हा कादंबरीचा प्रांत नाही असे नाही. उदाहरणार्थ वामन मल्हार जोशी आणि श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी प्रामुख्याने वैचारिक कादंबऱ्या लिहिल्या.

अशा प्रकारे कादंबरीने कविता, नाटक, कथा, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, पत्र इ. सर्व वाङ्मयप्रकारांची गुणवैशिष्ट्ये पचवलेली दिसतात. ती इतर सर्व वाङ्मयप्रकारांना स्पर्श करताना दिसते यासंदर्भात आनंद यादव म्हणतात, ''आधुनिक साहित्यप्रकारात कविता, ललित गद्य, कथा, नाटक इत्यादी प्रकारांतूनही आत्माविष्कार करता येत असला तरी, त्यांच्यावर प्राकारिक बंधने बरीच येतात. कवितेत आत्मनिष्ठेला आणि मानवी वृत्तीतील काव्यात्मतेलाच प्राधान्य असते. कवितेची भाषा, नाही म्हटले तरी, व्यवहारातील भाषेपेक्षा वेगळी पडते. ललित गद्यात गद्य भाषेला स्थान असले तरी, त्यातही आत्मनिष्ठेला प्राधान्य नसेल तर तो प्रकार कथेकडे, निवेदन प्रकृतीकडे झुकतो. कथेत कोणताही अनुभव व्यक्त करता येत असला, तरी त्याला तिच्या लांबीची, कालपट किती ध्यायचा याची अंगभूत मर्यादा असते. नाटक का प्रकारही सादरीकरणामुळे बंदिस्त झाला आहे. संवादापलीकडे जाऊन तिथे भाषेचा मुक्तपणे वापर करता येत नाही. कादंबरी ह्या साहित्यप्रकाराच्या बाबतीत अशी काही बंधने येत नाहीत.''[३१] या विवेचनातून वाङ्मयाच्या इतर प्रकाराशी तुलना करता 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार श्रेष्ठ ठरतो

**मराठी कादंबरीची वाटचाल :-**

मराठी साहित्यात 'कादंबरी' हा साहित्यप्रकार महत्वाचा ठरला आहे. मराठी कादंबरीची वाटचाल ही 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार समृध्द करणारी ठरली आहे. मराठी कादंबरीच्या वाटचालीचा आढावा घेणे कष्टाचे व जिकीरीचे काम आहे.

मराठीतील पहिली कादंबरी बाबा पद्मनजी यांची 'यमुनापर्यटन' ही १८५७ मध्ये प्रसिध्द झाली. यात प्रामुख्याने विधवांच्या दु:खाचे वर्णन आले आहे. या कादंबरीचे स्वरुप वर्णनपर निबंधासारखे आहे. यमुनेचा प्रवास हे सूत्र घेऊन त्या आधारे वेगवेगळ्या विधवांच्या दु:खाचे दर्शन बाबा पद्मजींनी घडविले आहे. संस्कृत आणि इंग्रजी गोष्टीची भाषांतरे याच सुमारास मराठीत होऊ लागली. सुरुवातीच्या काळात मराठी कादंबरीत कृत्रिम, नटवी भाषा आणि अद्भूत रम्य वातावरण याचा बराच परिणाम जाणवतो. यातूनच लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' ही अद्भूत रम्य कादंबरी १८६१ मध्ये लिहिली गेली. अद्भूतरम्य वातावरण आणि रंजनपरता, सुखांत शेवट यामुळे ही कादंबरी बरीच लोकप्रिय झाली त्याच धरतीवर 'मंजुघोषा', 'रत्नप्रभा', 'राजामदन', यासारख्या बऱ्याच कादंबऱ्या मराठीत निर्माण झाल्या. भडक व्यक्तिदर्शन, अद्भूतरम्य वातावरण आणि प्रणय व शृंगार या गोष्टींनाच या कादंबऱ्यात प्राधान्य होते. पुढे या प्रकारच्या कादंबऱ्यांची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली. यानंतर १८७१ मध्ये रा. भि गुंजीकरांची 'मोचणगड' ही ऐतिहासिक कादंबरी प्रसिध्द झाली.

नंतरच्या काळात इंग्रजी शिक्षणामुळे युरोपिय वाङ्मयाचा आणि नवविचारांचा परिचय आपल्याकडील विद्वानांना होऊ लागला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांचा परिचय सुशिक्षितांच्या मनावर झाला. सामाजिक सुधारणा आल्या पाहिजेत. व्यक्तिस्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे विचार आगरकरासारखे सुधारक आपल्या अग्रलेखातून सांगू लागले. आगरकरांच्या या विचारसरणीचा परिणाम कादंबरी क्षेत्रात हरिनारायण आपटे यांच्यावर मोठ्या प्रमाणात झाला हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्याचे लेखन त्यातूनच घडते. 'मधली स्थिती', 'मी', 'यशवंतराव खरे', 'पण लक्षात कोण घेतो?' यासारख्या कादंबऱ्यातून तत्कालीन समाजस्थितीचे, दुष्ट रुढी प्राबल्याचे, स्त्रियांच्या दास्याचे, पुरूषांच्या परधार्जिणेपणाचे अत्यंत परिणामकारक चित्र हरिभाऊंनी रेखाटले आहे. समाजाला आपण कसे आहोत

आणि कसे असायला हवे या नवविचारांचा बोध देण्याचे कार्य हरिभाऊंच्या कादंबरीने केले. सामाजिक कादंबऱ्याबरोबर ऐतिहासिक कादंबऱ्याच्या क्षेत्रातही त्यांनी खूप प्रगती केली आहे. 'चंद्रगुप्त', 'वज्राघात', 'सूर्योदय', 'गड आला पण सिंह गेला', 'उष:काल', 'रुपनगरची राजकन्या' या कादंबऱ्यामधून ऐतिहासिक सत्यकथाभास निर्माण करुन वाचकांना स्वातंत्र्याचा संदेश देण्याचा प्रयत्न हरिभाऊंनी केला.

मराठी कादंबरीला वास्तव बनविण्याचे तिच्यातून सामाजिक स्थितीचे दर्शन घडविण्याचे आणि ऐतिहासिक कादंबरीमधून स्वातंत्र्याची भावना निर्माण करण्याचे कार्य हरिभाऊ आपटे यांनी केल्याने मराठी कादंबरीत एक नवे युग निर्माण झाले.

याच सुमारास नारायण हरि आपटे यांनीही 'अजिंक्यतारा', 'आनंदमंदिर', 'सुखाचा मुलमंत्र', 'वैभवाच्या कोंदणात', 'ऐरणीवरील हिरा' इ. कादंबऱ्या लिहिल्या.

हरिभाऊ आपटे यांच्यानंतर वा. म. जोशी यांनी मराठी कादंबरीचा प्रवाह पुढे नेला. हरिभाऊंनी ज्या महाराष्ट्रीय स्त्रिची दु:खे आपल्या कादंबऱ्यातून रंगविली होती ती स्त्रि वा म जोशींच्या कादंबऱ्यातून शिकू लागली. विचार करु लागली. वा. म. जोशी यांच्या 'रागिणी', 'आश्रम हरिणी', 'इंदू काळे सरला भोळे' इ. कादंबऱ्यामधून तत्कालीन नुकत्याच शिकू लागलेल्या स्त्री वर्गाच्या इच्छांचे, आकाक्षांचे व मन:सृष्टीचे प्राधान्य आणि कादंबरी रचनेचे नवे प्रयोग हे वा. म. जोशी यांच्या कादंबरी लेखनाचे वैशिष्ट्य होय.

वा. म. जोशी यांच्यानंतर वरेरकर यांनी 'धावता धोटा', 'फाटकी वाकळ', 'कुलदैवत' इ. कादंबऱ्याद्वारे अनेक विषयांचे व समाजातील विविध वर्गांचे दर्शन घडविले.

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी आपल्या कादंबऱ्याद्वारे समाजातील वेगवेगळ्या प्रश्नांची चर्चा केली. ''गोंडवनातील प्रियंवदा', 'परांगदा', 'गावसासू', 'ब्राह्मणकन्या', 'आशावादी' या त्यांच्या कादंबऱ्या म्हणजे समाजशास्त्रीय प्रबंधच ठरतात. केतकरांनी कादंबरीला चिंतनशील बनविले. याच काळात शि म परांजपे, न. चिं. केळकर, यांचेही कादंबरी लेखन उल्लेखनीयच आहे.

मराठी कादंबरीतील या पुढचे युग म्हणजे फडके – खांडेकरांचे युग होय . ना. सी. फडके यांनी मराठी कादंबरीला कल्पनारम्य सृष्टीत नेऊन ठेवले. रंजन करणे हेच साहित्याचे ध्येय आहे असे मानून

ना. सी. फडके यांनी कादंबरीलेखन केले. मराठी कादंबरीला बांधेसूदपणा आणि सफाईदार भाषा ही ना. सी. फडके यांची देणगी ठरतो त्यांच्या 'कुलाब्याची दांडी', जादूगार, दौलत, अटकेपार, कलंकशोभा, समरभूमी इ. कादंबऱ्यात स्त्री-पुरुषाचे प्रेम आणि प्रणय हाच प्रमुख विषय आढळतो. तंत्राला प्राधान्य देऊन कादंबरीला त्यांनी डौल दिला आणि 'कलेसाठी कला' या दृष्टीकोनाचा पुरस्कार केला.

वि. स. खांडेकर हे जीवनवादी लेखक असल्यामुळे त्यांच्या कादंबरी लेखनात सामाजिक प्रश्नांना अधिक महत्व आहे. 'ऱ्हदयाची हाक', 'कांचनमृग', 'दोन ध्रुव', 'उल्का', 'हिरवा चाफा', 'दोन मने पांढरे डाग', 'क्रौंचवध', 'रिकामा देव्हारा' इ. कादंबऱ्यात त्याचे समाजाबद्दलचे विशाल प्रेम आणि शोषित पीडीताबद्दलची सहानुभूती प्रकट झाली आहे.

ग. त्र्यं. माडखोलकर यांनी लिहिलेल्या 'मुक्तात्मा' पासून नंतरच्या बहुतेक कादंबऱ्यामधून उन्मादक शृंगाराची वर्णन आलेली आहेत. 'भंगलेले देऊळ' व 'शाप' या त्यांच्या उत्कृष्ट कादंबऱ्या आहेत. याच सुमारास पु. ल. देशपांडे यांनी कादंबरीत अनुभवाचा अस्सलपणा आणण्याचा प्रयत्न केला त्याच्या 'बंधनाच्या पलिकडे', 'विशाल जीवन', 'काळी राणी सदाफुली', 'सुकलेले फुल' या महत्वपूर्ण कादंबऱ्या आहेत.

विभावरी शिरूरकर यांची कादंबरी वास्तवाला जवळ जाणारी कादंबरी आहे. 'हिंदोळ्यावर', 'विरलेले स्वप्न' या कादंबऱ्या वास्तवतेबरोबरच मराठीत मनोविश्लेषणाची परंपरा सुरु करणाऱ्या ठरल्या. असाच प्रयोग मर्ढेकरांच्या 'रात्रीचा दिवस' या कादंबरीत झाला आहे. वि. वि. बोकील, द. र. कवठेकर, वसंत कवठेकर, शांता शेळके आदि कादंबरीकारांनीही मराठी कादंबरीत मोलाची भर घातली आहे.

दुसऱ्या महायुध्दानंतर मराठी कादंबरीतील कल्पनारम्यतेचे वातावरण दूर झाले. आणि वास्तवातल्या विषयांना आणि जीवन चित्रणाला महत्व आले. विश्राम बेडेकरांची 'रणांगण' ही कादंबरी त्याचा प्रत्यय देते. १९३९ मध्ये प्रसिध्द झालेली ही कादंबरी अनुभव व रुप यांच्या अभिनत्वाचा प्रत्यय देणारी कादंबरी होय. १९४०-४५ नंतर साहित्याच्या सर्वच प्रकारात नवी जाणीव आलेली दिसते. दुसऱ्या महायुध्द्नंतरच्या झालेल्या मानवतेच्या वाताहतीत सर्व जूनी मूल्ये खचून गेली. नवा समाज संमिश्र, गुंतागुंतीचा बनला. माणसे भावनाशून्य झाली. सर्व प्रकारची विषमता वाढीस लागली. यांत्रिक, निष्प्रेम,

सहानुभूतीशून्य अशा मानवी जीवनाचे उदास व भकास चित्रण सास्हित्यातही उमटत राहिले. गुन्हेगार जमातीच्या सहवासानंतर विभावरी शिरुरकरांनी लिहिलेली 'बळी' ही कादंबरी मराठीत एकदम वेगळी ठरली.

र. वा. दिघे यांची 'पाणकळा' १९३९ मध्ये प्रसिध्द झाली व प्रादेशिक जीवन मराठी कादंबरीत येऊ लागले. याच काळात प्रादेशिकतेबरोबरच मनोविश्लेषणात्मकतेची नवी दिशा मराठी कादंबरीने पत्करली व पारंपारिक चौकट तिने नाकारली. तिच्या आशयात व रुपात हळूहळू बदल होऊ लागला.

स्वातंत्र्यानंतर मराठी कादंबरी लेखनाच्या प्रेरणा बदलल्या. तळागाळातला वर्ग आणि त्यांचे जीवन हा मराठी कादंबरीचा विषय बनू लागला. याचकाळात बोरकरांच्या 'भावीण' मधून भावीणीचे चित्र रेखाटले गेले र. वा दिघे, श्री. ना. पेंडसे, गो. नि दांडेकर, इ. कादंबरीकारांनी प्रादेशिकतेच्या जोराकस जीवनप्रवाह मराठी कादंबरीत आणून सोडला. वास्तववादी कादंबरीला फुटलेला तो एक नवा धुमारा होता. माडगुळकरांची 'बनगरवाडी', उध्दव शेळके यांची 'धग' याच काळात प्रसिध्द झाली. भूतकाळातील व्यक्तींची आपल्याला भावलेली रुपे नव्याने चित्रित करण्याचे प्रयत्न रणजित देसाई यांच्या 'स्वामी', ना स इनामदार यांच्या 'झुंज', 'झेप', गंगाधर गाडगीळ यांची 'दुर्दम्य' यासारख्या कादंबरीमधून झाले. भालचंद्र नेमाडे यांनी 'कोसला' मधून जीवनाची अर्थशून्यता भंकसपणा याची जाणीव करुन दिली. स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरीची वाटचाल विकासदायी ठरली. इ स. १९६० नंतर मराठी कादंबरीत अनेक परिवर्तने झाली आहेत. याच विकासाच्या जोरावर 'ग्रामीण' आणि 'दलित' साहित्याचा प्रवाह उदयास आला. त्यातून ग्रामीण जीवनाचे आणि दलित जीवनाचे दर्शन प्रत्ययकारी होऊ लागले. त्यादृष्टीने 'पाचोळा', 'गोतावळा', 'फकिरा', 'माहिमची खाडी', 'हकिकत आणि जटायू' यासारख्या कादंबऱ्या महत्वाच्या ठरतात. अशा प्रकारे जीवनातील अनेकविध अनुभवांचे, स्तरांचे, प्रदेशांचे, दर्शन मराठी कादंबरी घडवू लागली. स्वातंत्र्यानंतरच्या मराठी कादंबरीच्या अनेक वळणामध्ये 'दलित कादंबरी' हे वळण महत्वाचे आहे.

**दलित साहित्य प्रेरणा व स्वरुप :-**

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्याचा एक नवा जोमदार प्रवाह उदयाला आला. या दलित साहित्याची प्रेरणा म्हणून म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे पाहिले जाते. म. फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रणालीतून 'दलित साहित्य' उदयाला आले आहे असे मानले

जाते. म.फुल्यांनी मानवमुक्तीचा विचार मांडला. मानवत्वाची प्रतिष्ठा हा त्यांच्या विचारप्रणालीचा पाया आहे. डॉ. आंबेडकरांनी दलित जीवन बदलण्यासाठी दलितांमधील लाचारी व न्यूनगंड घालवून त्यांच्यामध्ये आत्मशक्ति आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. केवळ शैक्षणिक प्रगती केल्याने दलितांचा उध्दार होणार नाही तर त्या अनुषंगाने सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातसुध्दा दलितांमध्ये जागृती होणे त्यांना आवश्यक वाटले आणि म्हणून आंबेडकरांनी दलितांची सामाजिक धार्मिक व राजकीय कोंडी फोडून त्या त्या क्षेत्रात प्रवेश मिळवून दिला. व आम्हीही इतरांसारखी माणसे आहोत अशी आत्मविश्वासाची भावना त्यांच्यामध्ये निर्माण केली. आंबेडकरांनी दलितांसाठी हे लाख मोलाचे कार्य केले. म्हणूनच म.फुले आणि आंबेडकर यांना दलित साहित्याचे प्रेरणास्थान मानले जाते.

डॉ. आंबेडकरांबद्दल भालचंद्र फडके म्हणतात, ''जीवनाचे असे एकही क्षेत्र नाही की, ज्या क्षेत्रात बाबासाहेब ज्ञानाचा दिवा घेऊन गेले नाहीत. आपल्या अज्ञानी बांधवांना त्यांनी ज्ञानाची वाट दाखविली, दारिद्रयात खितपत पडलेल्या दलितांची अस्मिता जागृत केली. अन्याय, छळ निमूटपणे सोसणाऱ्या दलितांच्या मनात विद्रोहाची ठिणगी टाकली.''[३२]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे जनक आहेत. आदर्श आहेत, प्रेरणास्थान आहेत, हे निर्विवाद सत्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो एक लढा निर्माण केला त्यातून जो माणूस निर्माण झाला, त्या माणसाच्या मनातून दलित साहित्याचा जन्म झाला. आंबेडकरांनी घडवून आणलेल्या शैक्षणिक व वैचारिक प्रबोधनातून दलित साहित्याची चळवळ निर्माण झाली. परंपरेच्या दोरखंडाने बांधले गेलेले, अन्याय अत्याचार निमूटपणे सहन करणारे दलित मन विद्रोही भावनेने लिहून लागले. आपल्या भावना बोलून दाखवू लागले व दलित साहित्याचा प्रवाह समृध्द होत गेला.

शंकरराव खरात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल म्हणतात, ''डॉ. बाबासाहेब यांच्या प्रारंभापासून ते शेवटच्या मुक्तिसंग्रामापर्यंत अस्पृश्यांना दलितांना भयंकर क्रूर अशा गुलामगिरीतून मुक्त करुन अस्पृश्य, दलित माणसाला माणुसकी, स्वातंत्र्य, समता व बंधुता मिळवून देऊन त्यांची अस्मिता व स्वाभिमान जागृत करुन त्यांचा उध्दार, उन्नती व उत्कर्ष करणे हाच त्यांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्रांतीकार्याचा मूलभूत सिध्दांत होता मूलगामी ध्येय-उद्देश होते. यातून 'माणूस'

हाच त्यांच्या मुक्तिलढ्याचा केंद्रबिंदू होता, अगदी त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत ''[३३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या दलित चळवळीचा पाया मानवतावादी भूमिकेचा होता. त्यांच्या प्रेरणेतून उदंड साहित्यनिर्मिती झाली. त्यांनी साहित्यिकांना उद्देशून केलेल्या भाषणात म्हटले आहे, ''मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचं आहे की, उदात्त जीवनमूल्ये आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कृत करा आपल लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नापुरती बंदिस्त करु नका. तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या देशात उपेक्षितांचं, दलितांचे, दु:खितांचं फार मोठं जग आहे हे विसरु नका, त्यांचं जीवन उन्नत करण्यास झटा, त्यात खरी मानवता आहे.''

आंबेडकरांनी दिलेल्या या विशाल, व्यापक विचार प्रेरणेतून सुमारे १९६० पासून अनेक दलित साहित्यिकांनी साहित्य निर्मिती केलेली दिसून येते. त्यांनी कथा, कविता, कांदबरी, नाटक, आत्मकथन, अशा विविध वाङ्मयप्रकारात झपाटून लेखन केले त्यांच्या साहित्यनिर्मितीने उत्कट प्रेरणा व्यक्त केल्या दलित साहित्याबद्दल खूप लिहिले गेले, बोलले गेले, नव्याने जागृत झालेली दलित समाजातील विचारवंत माणसे १९६० पूर्वीच राजकीय सामाजिक क्षेत्राकडे वळलेली होती आणि १९६० नंतरच्या काळातही हीच विचारवंत मंडळी दलित वाङ्मयनिर्मितीकडे वळलेली आढळतात. असे बाळकृष्ण कवठेकरांचे म्हणणे दलित वाङ्मयाच्या इतिहासाला यथार्थ वाटते.

दलित कथेचे शिल्पकार अण्णाभाऊ साठे, दलित कथा साहित्य लिहिणारे शंकरराव खरात, बाबुराव बागूल, पुढील काळात कथा लेखन करणारे दया पवार, माधव कोंडविलकर, अर्जुन डांगळे, योगीराज वाघमारे, योगेंद्र मेश्राम, भिमराव शिरवाळे इ. लेखकांनी दलित कथालेखनाची परंपरा पुढे चालविली.

दलित लेखकांनी नाट्यक्षेत्रातही आगळी प्रगती दाखविली आहे. किसन फागुजी बनसोडे यांनी सुरु केलेली नाट्यलेखन परंपरा प्रभाकर गणविर, गंगाधर पानतावणे, नामदेव व्हटकर, सुरेश बंसारी, प्रा.म.भि.चिटणीस, दत्ता भगत, लक्ष्मण माने, प्रेमानंद गज्वी, रामनाथ चव्हाण आदि नाटककारांनी आज ही चालवली आहे.

दलित लेखकांची प्रतिभा सर्व वाङ्मयप्रवाहात प्रवाहीत झालेली आढळते. दलित साहित्यातील समृध्द दालन म्हणजे दलित आत्मकथने होत. अनेक दलित लेखकांनी उत्कृष्ट दर्जाची आत्मकथने लिहून दलित वाङ्मय प्रकारात मोलाची भर घातली आहे. दया पवारांचे 'बलुतं', शंकरराव खरातांचे 'तराळ अंतराळ', लक्ष्मण माने यांचे 'उपरा', लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या', दादासाहेब मोरे यांचे 'गबाळ', माधव कोंडविलकरांचे 'मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे', उत्तम बंडू तुपे यांचे 'काट्यावरची पोरं', शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी' यांची आत्मकथने विशेष गाजली. अलिकडील काळात 'घराण तमासगीराचं', 'बेरड', 'आक्रोश', 'तिन दगडाची चूल', या आत्मकथनांनी हा वाङ्मयप्रकार गतिमान ठरला आहे.

दलित साहित्यातील फार मोठी जागा कवितेने व्यापली आहे. किसन फागूजी बनसोडे, वामन कर्डक, ना. रा. शेंडे, दया पवावर, वामन निंबाळकर, ज. वि. पवावर, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळे, राजा ढाले, अरुण कांबळे, नारायण सुर्वे, प्रज्ञा लोखंडे, ज्योती लांजेवार, यशवंत मनोहर आदि कवींनी दलित कवितेचा प्रांत आपल्या प्रतिभा सामर्थ्याने संपन्न केला आहे

**दलित कादंबरी :-**

दलित साहित्याच्या प्रवाहामध्ये दलित कविता, कथा, आत्मकथा यांच्या मानाने 'दलित कादंबरी' हा वाङ्मयप्रकार प्रबळ आणि प्रभावी झालेला दिसून येत नाही. दलित कादंबरी संदर्भात भालचंद्र फडके म्हणतात, ''दलितांची कविता दलितांची कथा चित्त वेधून घेते पण दलितांची कादंबरी फारशी विचार करण्यासारखी नाही.''[३४] तर दलित कादंबरीविषयी मत मांडताना बाळकृष्ण कवठेकर म्हणतात, ''दलित लेखकांनी कादंबऱ्या लिहिलेल्या नाहीत असे नाही ? पण त्या रंजनात्मक, स्वप्नाळू, चटकदार अशा मराठी कादंबरीच्या वळणाच्याच आहेत. प्रश्न आहे तो हा की खरीखुरी दलित कादंबरी का निर्माण होऊ शकली नाही ? खरे तर दलित जीवनाचा शतकाचा प्रवास हा एखाद्या महाकादंबरीचा विषय होऊ शकेल, मर्यादित स्वरुपात विचार केला तर प्रत्येक दलित लेखकाचे जीवन हाही कादंबरीला पुरेसा समर्थ विषय होऊ शकेल. तरीही दलित कादंबरी निर्माण होऊ शकली नाही, असे का ?''[३५]

दलित कादंबरीविषयी कवठेकर आपले मत नोंदवतात. आणि ''एका विशिष्ट भूमिकेतून जीवनानुभवांचा केलेला स्वीकार आणि आविष्कार हे दलित साहित्यातील कादंबरीच्या अभावाचे महत्वाचे कारणे आहे.''[३६] असेही स्पष्ट करतात. ''दलित जीवनातील विविध प्रकारच्या अनुभवांना मोठा कॅन्व्हास प्राप्त करुन द्यायचा असेल तर कांदबरीकडे वळणे भाग आहे. दलित साहित्याने मराठी वाचकांना अद्याप एखादा हरिभाऊ आपटे किंवा मुन्शी प्रेमचंद दिलेला नाही. दलित लेखकांनी नाटक आणि कादंबरी या दोन महत्वाच्या साहित्यप्रकाराकडे वळावे अशी मराठी वाचकांची इच्छा आहे.''[३७] हे डॉ.जनार्दन वाघमारे यांनी दलित कादंबरी संदर्भात नोंदविलेले मत विचार करण्यासारखे आहे.

दलित कांदबरीचे लेखन कमी प्रमाणात झाले असले तरी दलित लेखकांनी पाऊणशेच्यावर कादंबऱ्या लिहिल्या आहेत. दलित साहित्याच्या निर्मितीच्या तीन पिढ्या दिसून येतात. या पिढीतील प्रमुख दलित कादंबरीकारांचा उल्लेख करुन दलित कादंबरी लेखनाचा आढावा घेता येईल.

**पहिल्या पिढीतील** - अण्णाभाऊ साठे, ना. रा. शेंडे, शंकरराव खरात

**दुसऱ्या पिढीतील** - केशव मेश्राम, बाबूराव बागूल, हरिभाऊ पगारे

**तिसऱ्या पिढीतील** - हिं. गो. बनसोडे, बा. सं. हारे, भि. शि. शिंदे, सुधाकर गायकवाड, भीमसेन देठे अशोक व्हटकर, मुरलीधर भोसेकर, विजय शिरसाट, उत्तम कांबळे, नामदेव कांबळे इ.

दलित कादंबरीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती अण्णाभाऊ साठे यांच्यापासून. अण्णाभाऊ साठे यांनी दलित कादंबरी खऱ्या अर्थाने समृध्द केली. ते कम्युनिस्ट मार्क्सवादी विचारांचे होते. पण त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून दलित माणसाचे सामाजिक मनच व्यक्त केले आहे. त्यांच्या कादंबरीतले नायक बेडर, ध्येयनिष्ठ, बंडखोर माणुसकी जपणारे आहेत. त्यादृष्टीने त्यांची 'फकिरा' ही कादंबरी महत्वाची ठरते.

अण्णाभाऊंचे वारणेच्या खोऱ्यात (१९५१), चित्रा (१९५१), फकिरा (१९५९), वैजयंता (१९५९), चंदन (१९६२), अलगूज (१९६२), माकडीचा माळ (१९६३), आवडी (१९६३), गुलाम

(१९६४), वैर (१९६४), चिखलातील कमळ (१९६५), धुंद (१९६६), कुरुप (१९६६), तारा (१९६७), अहंकार (१९६७), मयूरा (१९६८), वारणेचा वाघ (१९६८) असे कादंबरी विश्व साकार झाले आहे

अण्णाभाऊंच्या 'चित्रा', 'फकिरा', 'वैजयंता', 'चंदन', 'माकडीचा माळ', 'गुलाम', 'चिखलातील कमळ', 'रानबोका', 'आघात', 'डोळे मोडीत राधा चाले', 'रत्ना' या कादंबऱ्यामध्ये दलित जीवनाचे चित्रण आले आहे.

अण्णाभाऊंच्या कादंबरीलेखनाविषयी डॉ.भालचंद्र फडके लिहितात, ''अण्णाभाऊंनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्यात दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी आहे. ते सामान्यत: लोकप्रिय कादंबरीचा फॉर्म्युला वापरीत आहेत. मात्र काही कांदबऱ्यांतून ते दलित माणसाच्या व्यथांना बोलके करु शकतात ''[३८] तर डॉ. वसंत डोळस अण्णाभाऊंच्या कादंबरीबद्दल लिहितात, ''अण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनाचा वेग व पसारा मोठा होता. ते स्वत: दलित समाजातील होते. त्या समाजातील माणसांची सुखदु:खे त्यांनी स्वत: भोगली होती, त्यामुळे अनुभवांचे समृध्द भांडार त्यांच्याजवळ होते. त्यांना कादंबरी धाटणीही अवगत होती. इतके असूनही त्यांच्या कादंबरी लेखनात दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी प्रमाणात आढळते.''[३९]

अण्णाभाऊ साठे यांच्यानंतर शंकरराव खरातांचा दलित कादंबरी लेखनात उल्लेख करणे महत्वाचे ठरते. त्यांच्या 'हातभट्टी' (१९७०), 'मी मुक्त ! मी मुक्त ! (१९७१), 'झोपडपट्टी' (१९७३), 'गावचा टिनोपाल गुरुजी' (१९७३), 'मसालेदार गेस्ट हाऊस' (१९७४), 'पारधी' (१९८०), 'फुटपाथ नं १' (१९८०), या कादंबऱ्या महत्वपूर्ण ठरल्या आहेत. शंकरराव खरातांच्या 'झोपडपट्टी', 'मी मुक्त ! मी मुक्त !', 'पारधी', 'फूटपाथ नं.१'' या कादंबऱ्यात दलित जीवनाचे चित्रण आढळते.

शंकरराव खरातांनी 'हातभट्टी' या कादंबरीतून झोपडपट्टी जीवनाचे चित्रण घडविले आहे. तर 'मी मुक्त ! मी मुक्त' या कादंबरीत खरातांनी अनाथआश्रमात वाढलेल्या मुलाची कथा मांडली आहे फासेपारध्यांची पांढरपेशा समाजात वावरताना होणारी ससेहोलपट 'पारधी' कादंबरीत आली आहे.

शंकरराव खरातांच्या कादंबरी लेखनाविषयी डॉ. वसंत डोळस लिहितात, ''शंकरराव खरात हे दलित समाजातील आहेत. त्यांच्या जवळ दलित समाजाचे संपन्न अनुभवविश्व असताना ते दलित जीवनाची तळठाव घेऊ शकणारी एकही समर्थ कादंबरी लिहू शकले नाहीत.''[४०]

''त्यांच्या कथालेखनामागे जी सामाजिक जाणीव आहे ती कादंबरी लेखनामागे नाही. अखेरीस अण्णाभाऊ जसे रंजक कादंबरी लिहित राहिले, तसे खरातांनी लिहू नये.''[४१] असे मत डॉ. भालचंद्र फडके यांनी मांडले आहे.

शंकरराव खरात यांच्यानंतर दलित कादंबरी लेखनात ना. रा शेंडे यांचे योगदान महत्वाचे ठरते. त्यांच्या 'शृंगारलेले प्रेत' (१९३८), 'काजळी रात्र' (१९५६), 'तांबडा दगड' (१९५८), 'विलासिनी' (१९७४), 'अंशुजा' (१९७४), 'गायत्री' (१९७८) या महत्वाच्या कादंबऱ्या आहेत ''ना रा शेंडे हे स्वत· दलित समाजातील आहेत दलितांचे जिणे त्यांची स्वत· भोगले आहे. असे असून देखील त्यांच्या कांदबऱ्यामध्ये खऱ्या अर्थाने दलित जीवन चित्रित होताना दिसत नाही. त्यांच्या कांदबऱ्यामधील कथानकावर फार मोठ्या प्रमाणात आध्यात्मिक विचारांचा व अतीन्द्रिय विश्वाचा ठसा उमटलेला स्पष्टपणे जाणवतो ''[४२] हे डॉ वसंत डोळस यांनी नोंदविलेले मत महत्वपूर्ण ठरते.

दलितांच्या सुरुवातीच्या पिढीतील कादंबरीकार म्हणून नामदेव व्हटकर यांचे नाव घेणे गरजेचे ठरते. त्यांचे कादंबरी लेखन अल्प आहे. 'अपराधी' (१९४४) व 'सोळा शिणगार' (१९६८) या कादंबऱ्या आहेत. 'अपराधी' या कादंबरीत एका अनाथ तरुणाची कथा आली आहे, तर 'सोळा शिणगार' कादंबरी ही तमासगीरांच्या जीवनाचे दर्शन घडविते. नामदेव व्हटकर यांच्यानंतरचे कादंबरीकार म्हणजे हिं. गो. बनसोडे होय. त्यांच्या 'मुक्तिसंग्राम' (१९६९), 'उज्वला' (१९७३), 'आभाळाएवढी' (१९८१), या कादंबऱ्या आहेत. 'मुक्तिसंग्राम' या कादंबरीत दलितांचा मुक्तिलढा रंगविला आहे.

प्रा. केशव मेश्राम यांची कादंबरी लेखनात महत्वाची देणगी ठरली आहे. त्यांच्या 'हकीकत' व 'जटायू' (१९७२) व 'पोखरण' (१९७९) या कादंबऱ्या महत्वपूर्ण आहेत. त्यांच्या 'हकीकत' मध्ये एका दलित नायकाच्या जीवनातील आठ-दहा वर्षाच्या कालखंडातील अनुभव चित्रित झाले आहेत तर 'जटायू' ही प्रतीकात्मक कादंबरी आहे.

नंतरच्या कालखंडाचा विचार करता ज. वि. पवार यांची 'बलिदान' (१९७०), हरिभाऊ पगारे यांनी 'युगप्रवर्तक' (१९७०), भीमसेन देठे यांची 'इस्कोट' (१९८०), भि. शि. शिंदे यांची 'अमृतनाक' (१९८०), सुधाकर गायकवाड यांची 'शुद्र' (१९८०) या कादंबऱ्या दलित जीवनाचा विचार मांडतात. तर बाबूराव बागूल यांच्या 'सूड' या लहान पण गुणसामर्थ्यांने श्रेष्ठ ठरलेल्या कादंबरीत चाकोरी वेगळे कथानक आले आहे.

तर नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळा' (१९८१), अशोक व्हटकर यांची 'मेललं पाणी' (१९८२) या कादंबरी लेखनातून दलित जीवनाचे वास्तव स्वरुप मांडले आहे. 'हाडकी हाडवळा' या कादंबरीत दलित स्त्रीच्या व्यथा व्यक्त झाल्या आहेत. तर 'मेललं पाणी' ही कादंबरी, चांभारांना कातडी पुरविणाऱ्या ढोर जमातीसंबंधी आहे. योगेंद्र मेश्राम यांची 'माझं गाव कुठाय?' ही कादंबरी या कादंबरीत दलितांनी जुने किळसवाणे जीवन धिक्कारले. नवे मानवतावादी जीवन स्विकारले. दलितांकडून बुध्दाकडे प्रयाण केले हा जीवनप्रवास आला आहे.

शरणकुमार लिंबाळे यांच्या 'दंगल' व 'परपुरुष' या कादंबऱ्यांचा विचार करता, 'दंगल' कादंबरीत दलित चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या 'दलित पॅंथर' या दलित तरुणांच्या संघटनेचे चित्रण आले आहे. कचरु भालेराव यांच्या 'स्मशानभूमी' या कादंबरीत दलितांसाठी गनिमी काव्याने वापरली जाणारी 'फोडा व झोडा' ही नीती. त्याला बळी पडत असलेले दलितातील नेतृत्व, त्यामुळे पोरका आणि दिशाहीन झालेला दलित समाज, दलित ऐक्य गरजेचे आहे याचे महत्व या कादंबरीत स्पष्ट झाले आहे. बाबूराव गायकवाड यांच्या 'आग' या कादंबरीची मराठवाडा विद्यापीठ नामांतराची चळवळ ही प्रेरणा असून नामांतर प्रसंगी दलित व दलितेतरामधील निर्माण झालेल्या तणावाचे व परस्परसंबंधाचे चित्रण गायकवाडांनी केलेले आहे. उत्तम बंडू तुपे यांच्या 'झुलवा' कादंबरीत जोगतिणीच्या जीवनाची परवड मांडली आहे.

अशाप्रकारे काव्य, कथा, आत्मकथनाबरोबर दलित कादंबरीचे लेखन दलित साहित्यात झाले असले तरी समृध्द अशी दलित कादंबरी लिहिली गेली नाही. दलितांच्या वाट्याला आलेले दु:ख, वेदना, याबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुक्तिसंग्राम, त्यांची चळवळ, त्यांनी केलेले धर्मांतर याचे काही कादंबऱ्यातून चित्रण झाले असले तरी दलित जीवनाच्या वाटचालीचा हा जीवनपट थोड्याच कादंबरीत

आढळतो. आजच्या दलित कादंबरीकारांनी आजूबाजूच्या गदगदत, धगधगत असणाऱ्या वातावरणाला दिशा देणे गरजेचे आहे. दलित कादंबरीचा अपुऱ्या लेखनाचा विचार करता नामदेव कांबळे यांच्या कादंबरीने आशा पल्लवित केल्या आहेत. अलिकडच्या काही नव्या दलित कादंबरीकारांचा विचार करता नामदेव चं. कांबळे यांचे नाव महत्वपूर्ण ठरते.

प्रा. वसंत डोळस यांनी दलित कादंबरीचे ठळक विशेष सांगितले आहेत त्यावरुन दलित कादंबरीचे स्वरुप स्पष्ट होते.

''१) दलित साहित्यात दलित कविता व दलित कथा या साहित्यप्रकारात मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती झाली आहे. दलित साहित्यिकांनी भावना व विचार व्यक्त करण्यास हे जवळचे मार्ग अंगिकारलेले दिसतात. त्या मनाने दलित कादंबरी हा साहित्यप्रकार बराच क्षीण वाटतो.

२) दलित कादंबरीकारांनी महार, मांग, भटक्या जमाती, तमासगीर, वाघ्यामुरळी, वेठबिगार, झोपडपट्टी, हातभट्टी, फुटपाथवरील जीवन, स्त्रियावरील अत्याचार, साम्यवावद, वर्गसंघर्ष, फासेपारधी, अनाथांची समस्या, आंतरजातीय विवाह, अस्पृश्यांवर होणारे अन्याय, आदिवासी, अस्पृश्यांनी धर्मांतर केल्यावर निर्माण झालेल्या समस्या, अस्पृश्यतेमुळे होणारी उपेक्षा, आदिम व ऐहिासिक कालखंडातील दलित, दलितांमधील गटबाजीचे राजकारण, कुष्ठरोगी, शुद्र म्हणून जन्माला येण्याची खंत इ. विविध विषयावर कादंबरी लेखन केले आहे.

३) दलित कादंबरीकारांपुढे दलित जीवनाचा गतकालीन व वर्तमानकालीन एवढा विशाल व विस्तीर्ण जीवनपट उभा असताना, तसेच मराठी साहित्यात दलित जीवन हा विषय उपेक्षित असल्याची जाणीव असताना देखील दलित कादंबरीकारांची लेखणी दलित जीवनाचे चित्रण करण्यापेक्षा दलितेतर जीवनाकडेच अधिक झुकलेली दिसते.

४) दलित कादंबरी दलित समूह जीवनाचे, सामाजिक बांधलिकीचे तत्व जपताना दिसते.

५) दलित कादंबरीतील माणसे पोटासाठी धडपडताना दिसतात. पिढ्यानपिढ्या वाट्याला आलेली सामाजिक उपेक्षा, अन्याय निमूटपणे सहन करुन जगताना दिसतात.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'दलितांनी शिक्षण घेऊन पुढे आले पाहिजे. एकजुटीने अन्यायाविरुध्द लढा दिला पाहिजे. दलित माणसाला धर्मांतराशिवाय माणूस म्हणून जगता येणार नाही.' हे विचार दलित कादंबऱ्यातून व्यक्त होताना दिसतात.

७) दलित कादंबरीकारांच्या बहुतांश कादंबऱ्या या रंजनपर, स्वप्नाळू, चटकदार अशा कादंबरीच्या वळणाच्याच आहेत.

८) दलित साहित्याच्या चळवळीमुळे एका विशिष्ट भूमिकेने दलित जीवनानुभवांचा केलेला स्विकार आणि त्यातून स्वीकारलेले विशिष्ट स्वरुपाचेच अनुभव हे दलित कादंबरीच्या अभावाचे एक महत्वाचे कारणे आहे

९) आपल्या समाजाच्या जीवनाकडे दलित साहित्यिक आपल्या समाजाच्याच दृष्टिकोनातून पाहू शकतात. पण इतर समाजघटकाशी होणाऱ्या अभिसरणातून येणारी आकलन क्षमता दलित दृष्टिकोनातून आलेली दिसत नाही. तसेच कादंबरीसारख्या व्यापक वाङ्मयप्रकाराच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारी चिंतनात्मक दृष्टिकोनाची गरज जाणवत नाही. त्यामुळे दलित साहित्यिकांच्या हातून कादंबरीसारख्या वाङ्मयप्रकाराची निर्मिती फारशी होऊ शकलेली नाही.''[४३]

दलित कादंबरीच्या संदर्भात उणीवांची जाणीव होत असली तरी दलित कादंबरी आपले दलितपण घेऊन वाहते आहे. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, प्रा. केशव मेश्राम, ना. रा. जाधव, ना. रा. शेंडे, शंकर भाऊ साठे, अनंत घाडे, प्रा.शशिकांत तासगावकर या कादंबरीकारांनी दलित साहित्यातील कादंबरी का वाङ्मयप्रकार प्रवाहीत ठेवला आहे 'दलित कादंबरी' हा वाङ्मय प्रकार कमी प्रमाणात असल्याची ओरड विरोधक करत असले तरी केवळ अण्णा भाऊ साठे व शंकर भाऊ साठे यांचे विपुल कादंबरीलेखन विरोधकांची तोंडे बंद करण्यास समर्थ आहे.

साहित्य आणि समाज यांच्या अन्योन्य संबंध असतो. साहित्य हे समाजजीवनापासून अलग करता येत नाही. व्यक्ती ही समाजाचा एक अविभाज्य घटक असते. त्यादृष्टीने साहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार केला तर साहित्य निर्माण करणारा साहित्यिक, त्याचे व्यक्तिमत्व, त्या व्यक्तिमत्वाच्या

घडणीत असलेला त्यांच्या कुटुंबाचा वाटा, सामाजिक स्थान व दर्जा, त्याच्या व्यक्तिमत्वावर सामाजिक परिस्थितीचा व परिसराचा पडलेला प्रभाव, या सर्वांचा विचार करावा लागतो लेखकांच्या व्यक्तिमत्वाची घडण हा समाजशास्त्र व मानसशास्त्र यांचा विषय आहे. त्यासाठी नामदेव चं. कांबळे यांचे चरित्र व वाङ्मय यांचादुसऱ्या प्रकरणांत विचार केला आहे.

**समारोप :-**

आतापर्यंत आपण या प्रकरणात 'कादंबरी' या साहित्यप्रकाराचा अभ्यास करताना, कादंबरीची संकल्पना, कादंबरी म्हणजे काय ? कादंबरीची व्याख्या, कादंबरीचे घटक कोणते याचा विचार करुन मराठी कादंबरीची वाटचाल मांडण्याचा प्रयत्न केला आहे मराठी कांदबरीचा थोडक्यात आढावा घेतला आहे. गेल्या दीडशे वर्षात कादंबरी विविध अंगांनी वाढली आहे. १८५७ मध्ये 'यमुना पर्यटन' ही पहिली सामाजिक कादंबरी प्रसिध्द झाली. १८६१ मध्ये 'मुक्तामाला' ही पहिली कल्पनारम्य कादंबरी वाचकांसमोर आली आणि १८६७ मध्ये 'मोचनगड' नावाची पहिली ऐतिहासिक कादंबरी मराठीस लाभली पुढे या प्रकारांचा खूप विस्तार झाला.

१९६० नंतर कादंबरी लेखनात अनेक प्रयोग झाले. मराठी कादंबरी अनेक अंगाने समृध्द झाली. दरम्यान निर्माण झालेल्या दलित साहित्याची प्रेरणा-स्वरुप पाहून दलित कादंबरी लेखनाचा धावता आढावा घेतला. दलित कादंबरी वाङ्मयाने मानवी जीवनाचे एक अलक्षित रुप वास्तव स्वरुपात मांडून मराठी वाङ्मयाचे भांडार अधिकच समृध्द केले आहे. १९७५ नंतरच्या कालखंडात दलित कादंबरीचे लेखन करणारे नामदेव चं. कांबळे यांचा जीवन परिचय करुन घेणार आहोत व त्यांच्या साहित्याचा अभ्यास करणार आहोत. त्याचबरोबर त्यांच्या 'उनसावली' व 'सांजरंग' या कादंबरींचा अभ्यास करणार आहोत.

## संदर्भ सूची


१) श्री मा कुलकर्णी, 'कादंबरीची रचना', प्रस्तावना पृष्ठ क्र.७, आवृत्ती - १९७६, उन्मेष प्रकाशन, नागपूर - २.

२) उ.नि.पृ. २

३) डॉ. किशोर सानप, 'प्रायोगिक कादंबरी आणि श्याममनाहेर', पृष्ठ क्रं.१, आवृत्ती पहिली - १९९८, बजाज पब्लिकेशन्स.

४) श्री. मा. कुलकर्णी, 'कादंबरीची रचना', पृष्ठ क्रं.१३, आवृत्ती - प्रथम १९५६, उन्मेष प्रकाशन, नागपूर - २.

५) डॉ. मदन कुलकर्णी, 'मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि स्वरुप', पृष्ठ क्रं.५, आवृत्ती - प्रथम १९८४, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) उ.नि.पृ. ५

७) उ.नि.पृ. ५

८) श्री. मा. कुलकर्णी, 'कादंबरीची रचना', पृष्ठ क्रं.१३, आवृत्ती - प्रथम १९५६, उन्मेष प्रकाशन, नागपूर - २.

९) उ.नि.पृ. १४

१०) उ.नि.पृ. १४

११) उ.नि पृ. १५

१२) प्र. वा. बापट, ना. वा. गोडबोले, 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास', पृष्ठ क्रं.३७, आवृत्ती - तिसरी १९७३, व्हीनस प्रकाशन, पुणे.

१३) कुसुमावती देशपांडे, 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', पृष्ठ क्रं.१६, आवृत्ती - दुसरी १९७५, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन.

१४) ना. सी. फडके, 'प्रतिभा साधन', पृष्ठ क्रं. , आवृत्ती - सातवी, देशमुख आणि कंपनी प्रकाशन, पुणे.

१५) डॉ. रवींद्र ठाकूर, 'मराठी ग्रामीण कादंबरी', पृष्ठ क्रं.७, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे ३०.

१६) भालचंद्र नेमाडे, 'टीका स्वयंवर', पृष्ठ क्रं.२०७, आवृत्ती - प्रथम १९९०, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

१७) प्रा.जान्हवी संत, 'कादंबरी एक वाङ्मय प्रकार', आवृत्ती प्रथम, नोव्हेंबर १९७१, मोघे प्रकाशन, कोल्हापूर.

१८) उषा हस्तक, 'साहित्य अध्यापन आणि प्रकार', पृष्ठ क्रं.२५३.

१९) प्र. वा. बापट, ना. वा. गोडबोले, 'पृष्ठ क्रं.८५, आवृत्ती- तिसरी, व्हीनस प्रकाशन, पुणे.

२०) उ.नि.पृ.८५

२१) ना. सी फडके, 'प्रतिभा साधन', पृष्ठ क्रं. , आवृत्ती - सातवी, देशमुख आणि कंपनी प्रकाशन, पुणे

२२) प्र. वा. बापट, ना. वा. गोडबोले, 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास', पृष्ठ क्रं.१०५, आवृत्ती - तिसरी १९७३, व्हीनस प्रकाशन, पुणे.

२३) श्री. मा. कुलकर्णी, 'कादंबरीची रचना', पृष्ठ क्रं ९३, आवृत्ती - प्रथम, उन्मेष प्रकाशन, नागपूर - २

२४) प्रा. प्र. वा. बापट, ना. वा. गोडबोले, 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास', पृष्ठ क्रं. ११४, आवृत्ती - तिसरी १९७३, व्हीनस प्रकाशन, पुणे.

२५) डॉ. मदन कुलकर्णी, 'मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि स्वरुप', पृष्ठ क्रं , आवृत्ती - प्रथन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

२६) प्रा. प्र. वा. बापट, ना. वा. गोडबोले, 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास', पृष्ठ क्रं. १२९, आवृत्ती - तिसरी १९७३, व्हीनस प्रकाशन, पुणे.

२७) डॉ. मदन कुलकर्णी, 'मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि स्वरुप', पृष्ठ क्रं.८, आवृत्ती - प्रथम, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

२८) श्री मा. कुलकर्णी, 'कादंबरीची रचना', पृष्ठ क्रं. , आवृत्ती - प्रथम, उन्मेष प्रकाशन, नागपूर - २.

२९) उषा हस्तक, 'साहित्य अध्यापन आणि प्रकार, पृष्ठ क्रं.

३०) डॉ. प्र. ना. अवंसरीकर, 'सामाजिक कादंबरी : स्वरुप आणि समीक्षा', पृ.१३०, आवृत्ती प्रथम, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३१) आनंद यादव, '१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह', पृष्ठ क्रं.३६, आवृत्ती - प्रथम, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३२) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना व विद्रोह', पृष्ठ क्रं.४३, आवृत्ती तिसरी नोव्हेंबर २०००, श्रीविद्या प्रकाशन.

३३) शंकरराव खरात, 'दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती', पृष्ठ क्रं.४२, आवृत्ती - पहिली, मार्च १९७८, इनामदार बन्धु प्रकाशन, पुणे ३०.

३४) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना व विद्रोह', पृष्ठ क्रं.२०८, आवृत्ती - तिसरी, नोव्हें. २०००, श्रीविद्या प्रकाशन.

३५) संपादक - गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर, 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप', पृष्ठ क्रं.३०१, आवृत्ती - , पॉप्युलर प्रकाशन.

३६) उ. नि. पृ. ३०१.

३७) डॉ. जनार्दन वाघमारे, 'साहित्य चिंतन', पृष्ठ क्रं. ८६, आवृत्ती - प्रथम १९९२, प्रतिमा प्रकाशन.

३८) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना व विद्रोह', पृष्ठ क्रं.२०९, आवृत्ती - तिसरी, नोव्हें. २०००, श्रीविद्या प्रकाशन.

३९) डॉ. वसंत डोळस, 'दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप', पृष्ठ -७६, आवृत्ती पहिली - १९९२, दिलीपराव प्रकाशन, पुणे.

४०) उ. नि. पृ.

४१) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना व विद्रोह', पृष्ठ क्रं.२१२, आवृत्ती - तिसरी, नोव्हें. २०००, श्रीविद्या प्रकाशन.

४२) डॉ वसंत डोळस, 'दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप', पृष्ठ -७९, आवृत्ती पहिली - १९९२, दिलीपराव प्रकाशन, पुणे.

४३) उ. नि. पृ. ७९